**नियमित दिवाणी दावा क्र.९४/२०१६**

**अशोक वि. माणिक व इतर**

**<u>आदेश निशाणी क्रंमाक ३४ वर</u>**

**MHLA13000341 2014**

**१.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला २७६ दिवसांचा विलंब माफ होउन मिळण्यासाठी दिला आहे. वादी यांनी अर्जाच्या पाठीमागे आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास हरकत घेण्यात आली. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.४ हे दि. ०८.०३.२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादी यांना मुदतीत मयताचे वारस अभिलेखावर आणणसाठी अर्ज करता आला नाही. दाव्याचा अंतीमत: आणि गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी मयत प्रतिवादी वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे कारण दाव्यातील त्याची मागणी टिकून आहे.

**३.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करून त्यांनी आक्षेप नोंदवला. तसेच प्रस्तुतच्या अर्जामध्ये विलंबाचे कोणतेही संयुक्तीक कारण दिले नसल्याचे नमूद केले आहे. वादींनी मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणण्याकरीता जाणूबुजून विलंब केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादींतर्फे प्रस्तुत अर्जासोबत शपथपत्र दिले आहे. अर्जांतील वर नमुद कारणांचा विचार करता मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणणेसाठी जाणिवपुर्वक विलंब केल्याचे दिसुन येत नाही. अश्या परीस्थितीत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर येउन या दाव्यात

गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी त्यांना संधी देणे न्यायोचित होणार आहे. अर्जातील कारणांचा विचार केला असता वादीने सांगितलेले कारण संयुक्तीक वाटते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र आहेत. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.३४ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी चे वारस अभिलेखावर आणणेसाठी झालेला विलंब रक्कम रु.१०००/- दंड वादी यांच्यावर बसवुन माफ करण्यात येतो.

३. अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

स्वाक्षरीत/-

**दिनांक ०३/०४/२०२५**
**रेणापूर**

**के.के.वाघमारे**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**रेणापूर**